# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.03.2026** **वारः मंगळवार**

---

1. पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशातील नागरिकांनी एकजूट दाखवावी – पंतप्रधानांचं आवाहन
2. भोंदुबाबा अशोक खरातशी संबंध असलेल्या सर्वांवर कारवाई करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
3. वन्यजीव संरक्षण सुधारणा विधेयकाला विधान परिषदेची मंजुरी आणि
4. एसटी महामंडळच्या ताफ्यात राजमाता जिजाऊ अत्याधुनिक बस आज दाखल होणार

**मोदी लोकसभा**

पश्चिम आशियातील संघर्ष थांबवण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरी हाच एकमेव मार्ग असल्याचा पुनरुच्चार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधानांनी काल लोकसभेत निवेदन दिलं. पश्चिम आशियातील परिस्थिती तणावपूर्ण आहे, अशा परिस्थितीत देशातील नागरिकांनी एकजूट दाखवावी आणि सज्ज राहावं असं आवाहन त्यांनी केलं.....

**दुनिया में जो कठिन हालात बने हैं, उनका प्रभाव लंबे समय तक बने रहने की आशंका है। इसलिए हमें तैयार रहना होगा। हमें एकजुट रहना होगा। हम कोरोना के समय भी एकजुटता से ऐसी चुनौतियों का सामना कर चुके हैं। अब हमें फिर से उसी तरह तैयार रहने की आवश्यकता है। धीरज के साथ संयम के साथ शांत मन से हमें हर चुनौती का मुकाबला करना है और यही हमारी पहचान है। यही हमारी ताकत है और हाँ, हमें बहुत सावधान और सतर्क भी रहना है।**

पश्चिम आशियात संघर्ष सुरू असला, तरी भारतात ऊर्जा सुरक्षेचं कोणतंही संकट नाही, देशभरात पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू आहे, असं पंतप्रधान म्हणाले. या संघर्षामुळे, होर्मुझ सामुद्रधुनी मार्गे होणाऱ्या कच्चे तेल, वायू आणि खतांच्या पुरवठ्यावर परिणाम होत असला, तरी देशातील पेट्रोल, डिझेल आणि गॅस पुरवठा स्थिर ठेवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं पंतप्रधानांनी स्पष्ट केलं.....

**भारत में बड़ी मात्रा में कच्चा तेल, गैस और फर्टिलाइजर जैसी अनेक जरूरी चीजें हार्मज स्टेट के रास्ते से आती हैं। युद्ध के बाद से ही हार्मज स्टेट में जहाजों का आनाजाना बहुत चुनौतीपूर्ण हो गया है। बावजूद इसके हमारी सरकार का यह प्रयास रहा है कि पेट्रोल, डीजल और गैस की सप्लाई बहुत ज्यादा प्रभावित न हो। देश के सामान्य परिवारों को परेशानी भी कम से कम हो। इस पर हमारा फोकस रहा है।**

आखाती देशांमध्ये राहणाऱ्या सुमारे 1 कोटी भारतीयांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असून आतापर्यंत तीन लाखांहून अधिक भारतीयांना सुरक्षित परत आणण्यात आल्याची माहितीही पंतप्रधानांनी दिली.

**विधीमंडळ**

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात ज्यांचा दुरान्वयेही संबंध असेल त्यांना सोडणार नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत सांगितलं. खरातनं अनेक महिलांसोबत दुष्कृत्य केलं, पण अनेक महिला घाबरून समोर यायला तयार नव्हत्या. आता काही महिलांनी तक्रार केली आहे. हे प्रकरण अतिशय गंभीर असून, पोलीस याप्रकरणी कारवाई करत आहेत. हा राजकारणाचा मुद्दा नसून महिलांच्या सन्मानाचा प्रश्न आहे, त्यामुळे यावर आपण सभागृहात सविस्तर निवेदन देणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

त्याआधी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. या भोंदूबाबाशी अनेक अधिकारी आणि मंत्र्यांचेही संबंध होते. या सर्वांचे राजीनामे घेऊन त्यांना सहआरोपी करा, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली. या प्रकरणामुळे महाराष्ट्राची

बदनामी झाली आहे, असं ते म्हणाले. नाना पटोले आणि भास्कर जाधव यांनीही याचा पुनरुच्चार केला. या विषयावर सभागृहात अल्पकालीन चर्चा घडवून आणावी, अशी मागणी त्यांनी केली. मात्र ही मागणी अध्यक्षांनी फेटाळून लावली. यानंतर शिवसेनेच्या आमदारांनी हौद्यात उतरून गदारोळ केला. या गदारोळातच महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदे सुधारणा विधेयक मांडण्यात आलं.

सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडणुकीदरम्यान झालेल्या वादाचे पडसाद काल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात उमटले. मंत्री शंभूराज देसाई यांनी पोलिसांच्या कारवाईचा मुद्दा उपस्थित करत, पोलीस अधीक्षकांच्या बडतर्फीची मागणी केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या मुद्द्याला पाठिंबा दिला; संबंधित लोकप्रतिनिधींना मतदानापासून रोखणं ही 'लोकशाहीची हत्या' असल्याचं शिंदे म्हणाले. याप्रकरणी चौकशी करुन योग्य कारवाई करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिलं. विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी याप्रकरणी पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे निर्देश दिले. मात्र, मंत्री जयकुमार गोरे यांनी याला हरकत घेतली, पूर्वचौकशी न करता अशाप्रकारे निलंबनाचे निर्देश देणं योग्य नसल्याचे मत नोंदवलं. त्यावर सभापती राम शिंदे यांनी उपसभापतींनी दिलेल्या निर्देशांवर आपला निर्णय तयार असून तो सध्या राखून ठेवत असल्याचं जाहीर केलं.

राज्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहे. याचा अहवाल आल्यानंतर शेतकऱ्यांना मदत दिली जाईल, असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत सांगितलं. वन्यजीव संरक्षण महाराष्ट्र सुधारणा विधेयक 2026 विधानपरिषदेनं एकमतानं मंजूर केलं. मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्यासाठी राज्य सरकारच्या परवानगीने बिबट्यांचं स्थानांतरण करणं, संख्येचं व्यवस्थापन करणं यासाठी वन्यजीव रक्षकाला आवश्यक पावलं उचलण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या दुसरी सुधारणा विधेयक, 2026 लाही विधानपरिषदेनं काल मंजुरी दिली. यानुसार जिल्हा परिषदेत एकंदर सदस्य संख्येच्या 10 टक्के किंवा 5 सदस्यांना नामनिर्देशित करण्याची तसंच पंचायत समित्यांमध्ये एकंदर सदस्य संख्येच्या 20 टक्के किंवा एका सदस्याला नामनिर्देशित करण्याची तरतूद आहे. या सदस्यांना मताधिकार नसेल, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे. राज्यातले कालबाह्य झालेले, कायदे रद्द करणारं महाराष्ट्र निरसन विधेयकही, विधानपरिषदेत मंजूर झालं. ही तिन्ही विधेयकं विधानसभेनं याआधीच मंजूर केली आहेत.

**<u>जिजाऊबस-मुंबई</u>**

एसटी महामंडळच्या ताफ्यात राजमाता जिजाऊ या नावानं तीन हजार स्मार्ट बस दाखल होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबईत विधान भवनात या बसेसचं लोकार्पण होणार आहे. या 56 आसनी बस राज्याच्या खेड्यापाड्यात कानाकोपऱ्यात नागरिकांना वाहतूक सेवा देतील, असं परिवहन मंत्री आणि एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितलं, ते म्हणाले....

**महाराष्ट्र राज्यामध्ये एसटी महामंडळाच्या एकत्रितरित्या तीन हजार बसेस या पहिल्यांदाच येणार आहे. आणि त्याचं लोकार्पण होणार आहे टू बाय थ्री ची ही छप्पन्न आसन क्षमतेची बस ही महाराष्ट्रातील खेड्यापाड्यामध्ये पोहोचवण्याचं महायुती सरकारचं उद्दिष्ट आहे. या एसटी बसेसचं नामकरण राजमाता जिजाऊ इथ होणार आहे**.

**<u>गुढीपाडवा-पट वाढवा</u>**

राज्यातल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये तसंच अन्य शासकीय शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवण्यासाठी 'गुढीपाडवा-पट वाढवा' हे अभियान नुकतंच सुरू झालं आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील गरदरेवाडी इथल्या जिल्हा परिषद शाळेत या अभियानाची सुरुवात झाली. याबाबत आकाशवणीला अधिक माहिती देताना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक परिषदेचे संचालक डॉ. हेमंत वसेकर म्हणाले....

**दिनांक 22 मार्च रोजी माननीय मंत्री श्री दादाजी भुसे साहेब आपल्या पुणे जिल्ह्यामधील दरदरेवाडी या गावामध्ये आले होते. त्या गावातील जे स्थानिक ग्रामस्थ आहेत यांनी शाळेसाठी स्वतःची जमीन दान दिलेली आहे. आणि एवढंच नाही तर त्या ठिकाणी एका कंपनीने सीएसआर माध्यमातून त्या ठिकाणी सुंदर शाळेचं बांधकाम सुद्धा केलेलं आहे. दुसरा असा मुद्दा होता की आपल्याकडे टॅग लाईन आपल्याला माहित आहे की गुढीपाडवा आणि, पट वाढवा शासकीय शाळांच्यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचं**

**प्रमाण जर कमी होत असेल तर तो अधिक प्रोत्साहित केला पाहिजे मुद्दा तर साधारणतः जून महिन्यामध्ये आपला शाळेचा पहिला दिवस असतो तर तत्पूर्वीच एक प्रकारचं वातावरण निर्मिती व्हावी आणि अभियान स्वरूपामध्ये हा संदेश जावा साधारणतः आपण एक अभियान सुरू केलं असं आपण म्हणू आणि भविष्यामध्ये अजूनही आपण त्यासाठी अधिकचे प्रयत्न या ठिकाणी करणार आहोत.**

**हुतात्मा दिन**

देशासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना काल हुतात्मा दिनानिमित्त देशभरात सर्वत्र आदरांजली अर्पण करण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुंबईत लोकभवन इथं तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या निवासस्थानी या तीनही हुतात्म्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. राज्यातही विविध ठिकाणी काल भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना अभिवादन करण्यात आलं. पुणे जिल्ह्यातील राजगुरू नगर इथल्या राजगुरू यांच्या वाड्यामध्येही अनेक नागरिकांनी हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली.

**आंदोलन-नागपूर**

एपस्टिन फाईल प्रकरणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघानं स्पष्ट भूमिका घ्यावी, या मागणीसाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली काल नागपुरात संयुक्त मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**अंत्यसंस्कार**

ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर काल पवनार इथं शासकीय इतमामानं अंत्यसंस्कार करण्यात आले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते. तत्पूर्वी मेघे यांच्या नागपुरातल्या निवासस्थानी आणि नंतर सावंगी मेघे इथं त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकणात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून विदर्भात कोरडं हवामान राहण्याचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.